सकाळ » TODAY
बारामती विभाग

पुणे जिल्हा

पुणे, गुरुवार, १७ जून २०२१
३

## विद्या प्रतिष्ठानमध्ये ऑनलाइन योग कार्यशाळा

**बारामती :** विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालयामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून ७ ते ९ जूनपर्यंत तीन दिवसीय ऑनलाइन पद्धतीने योग कार्यशाळा आयोजित केली होती. या शिबिरामध्ये कल्पना शेलार यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी योगासने, प्राणायाम आणि सूर्यनमस्काराची प्रात्यक्षिके करून दाखवली. या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या कार्यशाळेसाठी विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या विश्वस्त सुनेत्रा पवार, उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, सचिव ॲड. नीलिमा गुजर, खजिनदार युगेंद्र पवार, महाविद्यालयाच्या प्राचार्या राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. नथू ठोंबरे आणि अक्षय पाटील यांनी या परिश्रम घेतले.

**विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चर बारामती मध्ये योग प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न**

दिनांक २१ जून आतंराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून बारामती येथील विद्या प्रतिष्ठान स्कूल ऑफ आर्किटेक्चर महाविद्यालयामध्ये दि. ०७ जून ते ०९ जून २०२१ रोजी तीन दिवसीय ऑनलाईन पद्धतीने योग कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेच्या प्रशिक्षणासाठी योग शिक्षिका म्हणून कल्पना शेलार यांनी अतिशय बहुमूल्य मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी योगासने, प्राणायम आणि सूर्यनमस्काराची प्रात्यक्षिके करुन दाखवली. नियमितपणे योगासने केल्यास आपल्या शरीराचा शारीरिक आणि मानसिक समतोल साधण्यात मदत होते हे त्यांनी संबोधून सांगितले.

योग प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उस्फुर्तपणे सहभाग नोंदविला. या कार्यशाळेच्या निमित्ताने विद्यार्थी आणि शिक्षकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यशाळेसाठी विद्या प्रतिष्ठान संस्थेचे विश्वस्त मा. सौ. सुनेत्रावहिनी पवार, उपाध्यक्ष ॲड. अशोक प्रभुणे, सचिव ॲड. नीलिमा गुजर, खजिनदार मा. युगेंद्र पवार आणि इतर सर्व व्यवस्थापकीय सदस्य तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. राजश्री पाटील यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेचे नेतृत्व व्यवस्थितपणे पार पडण्यासाठी श्री. नथू ठोंबरे आणि श्री. अक्षय पाटील यांचे सहकार्य लाभले.






कार्यशाळेदरम्यान टिपलेले छायाचित्र

प्र-प्राचार्य
विद्या प्रतिष्ठानचे
स्कुल ऑफ आर्किटेक्चर, बारामती
विद्यानगरी,बारामती जि.पुणे ४१३१३३